## मानसिकता

जेवता जेवता अचानक सारिका उठली. सारंगच्या आत्याने तिला विचारलं, "काय झालं मुली तू अचानक जेवण सोडून का उठली? तुझी तब्येत तर ठीक आहे ना? तुला जेवण आवडलं नाही का? दुसरं काही बनवून देऊ का?" सारिका कसनुसं हसत म्हणाली, "नाही न... नको मला जास्त भूक नाही. जेवण छान आहे." असं म्हणत तिने थोडंस रागानेच सारंगकडे पाहिलं. सारिकाच्या चेहऱ्यावरची अस्वस्थता सारंगने टिपली होती. सारिका एक डॉक्टर होती. सारंग तिच्याच हॉस्पिटलमध्ये ट्रेनी डॉक्टर होता. अचानक इमर्जन्सी आल्याने त्या दोघांना एका छोट्याशा गावात यावं लागलं. त्याच गावात सारंगची आत्या रहात होती. गावात त्यांचं फार प्रस्थ होतं. जातीने ठाकूर असल्याने आणि श्रीमंत जमिनदार असल्याने गावात बराच मान होता. तरी पिढ्यानपिढ्यांचे संस्कार असल्याने खालच्या जातीच्या लोकांकडे पहाण्याची व त्यांना वागवण्याची पद्धत फार वाईट होती.

गावातील रोगी पहाता-पहाता बराच वेळ झाला होता. सारंगने सारिकाला आत्याकडे जायचं का म्हणून तिला विचारलं. सारिकाला संकोच वाटत असल्याने ती सारंगला म्हणाली, "नको रे तू जाऊन ये. मी इकडेच कुठेतरी धाब्यावर जेऊन घेईन, शिवाय आपल्याबरोबर ड्रायव्हर पण आहे. उगाच आत्याला कशाला त्रास?" पण सारंगने तिला खूप आग्रह केल्याने सारिकाचा नाईलाज झाला. खरंतर तिलाही भूक लागलीच होती. मग तिनेही जास्त आढेवेढे न घेता त्याच्याबरोबर जायची संमती दिली. गावाबाहेर जरा एकांट रस्त्यावरच आत्यांचा खूप मोठा बंगला होता. सारंगने चौकीदाराला ओळख सांगून गाडी आत घेतली. त्याने आधी फोन करून कळवले असल्याने आत्या व आत्योबा त्यांची वाटच पहात होते. सारंगने त्यांना वाकून नमस्कार केला. सारिकानेही त्यांना हात जोडून नमस्कार केला. ती दोघंही दिवाणखान्यात गेली. ड्रायव्हरला मात्र चौकीदाराने बाहेरच थांबवले होते. सारिकाच्या चाणाक्ष

(P.T.O)

(2)

## मानसिकता...

नजरेतून ती गोष्ट सुटली नाही. सारंगने फोन केल्यामुळे जेवणाची तयारी झाली होती. दोघंही हातपाय धुवून जेवायला बसले. सारिकाने ड्रायव्हरला बोलावू का असं विचारल्यामुळे सारंगची झालेली चलबिचल तिने ओळखली. आत्याने सारंगला इशाऱ्यानेच आत बोलावलं — आत्याच्या हळू हळू आवाज सारिकाच्या कानावर पडला, "सारंग तुला तर माहित आहे ना खालच्या जातीच्या लोकांना आपल्याकडे प्रवेश नाही मग तू त्याला बंगल्यात कशाला आणलंस? बरं मी नोकराच्या हाती त्याचं जेवण पाठवते. जेवल्यानंतर त्याला ताट बाहेरच घासून ठेवायला सांग." सारंग पडल्या चेहऱ्याने बाहेर येऊन बसला. त्याच्या पाठोपाठ पाच मिनिटाने नोकराच्या हाती ॲल्युमिनीअमच्या थाळीत आत्यांनी जेवण पाठवलं. ह्या प्रकाराने सारिकाच्या मनात उद्वेग दाटून आला होता. अजूनही ही मानसिकता! मग आपण खालच्या जातीच्या आहोत हे कळल्यावर आत्या काय करतील? या विचाराने अस्वस्थ होऊन ती जेवायचं ताट बाजूला सरकवून उठली.

सौ. ऐश्वर्या डगांवकर. इंदूर
भ्रमणध्वनी - ९३२९८३५६७५



